प्रस्ताव व ई-लिलाव प्रक्रिया

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## जाहीर ई-निविदा सुचना (तिस-यांदा)

2 DEC 2024

जाक्र.नांवाशमनपा/जवमा/10244/२०२४ दि.----------

सर्व नोंदणीकृत सफाई कामगार संस्था यांना कळविण्यात येते कि, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे देगलूरनाका भागातील हैदरबाग दवाखाना व शिवाजीनगर दवाखाना येथे एकुण १० सफाई कामगार पुरविणेचा मक्ता तीन वर्षाकरिता देण्यासाठी खालील प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे परिपत्रक क्र.जीएसटी-१०१७/प्र.क्र.८१/कराधान-१ दि.१९.०८.२०१७ अन्वये जीएसटी कराची रक्कम सदरील निविदेत समाविष्ठ असेल. सदर निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन खरेदी करता येईल. तसेच ई-निविदेच्या नियम व अटी सदर संकेतस्थळावर उपलब्ध असतील. डिजीटल सिग्निचर रजिस्टेशन अनिवार्य आहे.

सदरील निविदा फक्त ईंटरनेटवरुनच खरेदी करता येतील व भरता येतील. को-या निविदेची रक्कम रु.१,१००/- एवढी राहील. तसेच निविदेतील कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करण्यात यावी. को-या निविदेची रक्कम व अनामत रक्कम Online payment gateway द्वारे भरणा करावे.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रकाशित करणे | 04.12.2024 | 15.00 |
| २ | ई-निविदा डाऊनलोड करणे | 04.12.2024 | 15.00 |
| ३ | ई-निविदा भरणे. | 04.12.2024 | 15.00 |
| ४ | ई-निविदा भरण्याचा अंतीम दिनांक व वेळ | 24.12.2024 | 15.00 |
| ५ | ई-निविदा उघडणे | 27.12.2024 | 15.00 |

| अ.क्र. | कामाचे नाव | कामगार संख्या | अनामत रक्कम | को-या निविदेची किंमत | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे हैदरबाग दवाखाना व शिवाजीनगर दवाखाना येथे १० सफाई कामगार पुरविणे बाबत | १० | २,००,०००/- | १,१००/- | ३ वर्ष |

अतिरीक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत-
१)संपादक, दैनिक श्रमिक ठाकुर २) संपादक, दैनिक समता दर्पण, नांदेड यांना सदरील जाहीर सुचना आपल्या दि.04/12/2024 रोजीच्या अंकात 16 x 15 चौ.सोमी जागेत प्रसिद्ध करुन देयक दोन प्रतीत शासकिय दरपत्रकासह दाखल करावे.
२)मुख्यलेखापरिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३)मुख्यलेखा व वित्त अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
४) अंतर्गत लेखापरिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
५) सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना देऊन कळविण्यात येते कि, सदर ई-निविदा प्रक्रिया विहीत दिनांक रोजी करण्यात यावी. तसेच निविदेच्या नियम अटी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.
६) नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

अतिरीक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रस्ताव व ई-लिलाव प्रक्रिया

**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे हैदरबाग दवाखाना व शिवाजीनगर दवाखाना येथे साफसफाई करिता एकुण १० सफाई कामगार पुरविणेच्या मक्त्याबाबतच्या नियम व अटी</u>**

१) महानगरपालिका मालकीचे हैदरबाग दवाखाना व शिवाजीनगर दवाखाना येथे सफाई कामाकरिता १० सफाई कामगार पुरविणेसाठीचा मक्ता राहील.

२) सदर मक्ता ०३ वर्षाकरिता देण्यात येईल. सदरील काम केव्हाही ०१ महिन्याची नोटीस देऊन मक्ता रद्द करण्याचा अधिकार आयुक्त, नांवाशमनपा यांना राहील. तसेच निविदा कालावधी संपुष्टात आल्यानंतर काही तांत्रिक कारणामुळे पर्यायी व्यवस्था उपलब्ध होईपर्यंत कंत्राटदारास चालु मंजुर दरावरच काम करावे लागेल.

३) सदरील साफसफाईचे काम अर्धवट सोडुन न जाण्यासाठी अनामत रक्कम रु.२,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.दोन लक्ष फक्त) विना व्याज मनपाकडे अनामत म्हणुन जमा ठेवावी लागेल.

४) कंत्राटदाराच्या कामगारांकडुन हैदरबाग दवाखान्यामधील व शिवाजीनगर दवाखान्यामधील साहित्य किंवा फर्नीचरचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी निश्चित करुन नुकसानीची भरपाई त्याच महिन्याच्या देयकामधुन कपात करण्यात येईल.

५) साफसफाईकरिता लावण्यात येणा-या कामगारांच्या बाबतीत राज्यामध्ये प्रचलीत असलेल्या लेबर अँक्टच्या नियमांचे पालन कंत्राटदारास करावे लागेल. सदर नियमाचे उल्लंघन झाल्यास कंत्राटदार जबाबदार राहील. सदर कामासाठी लावण्यात येणा-या कामगारांना किमान वेतन अधिनियमानुसार वेतन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

६) कंत्राटदाराच्या मक्त्याच्या प्रतिमहा देयकातुन ५ टक्के सुरक्षा रक्कम म्हणुन कपात करण्यात येईल व अशी रक्कम मक्त्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर परत मागण्याचा अधिकार कंत्राटदारास राहील.

७) किमान वेतन अधिनियम १९४८ च्या इतर तरतुदी तसेच महाराष्ट्र घरभाडे भत्ता अधिनियम १९८३, बोनस प्रदान अधिनियम १९६५
कंत्राटी कामगार कायद्या अंतर्गत उद्भवणारे दायीत्व स्विकारणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.
कंत्राटदारास कामावर लावण्यात आलेल्या सफाई कामगारांचे ईएसआयसी अँक्ट १९४८ (सुधारीत) अंतर्गत समाविष्ट करुन या
८) कंत्राटदारास कामावर लावण्यात आलेल्या सफाई कामगारांचे ईपीएफ रक्कम
योजनेची सहभाग रक्कम भरणे बंधनकारक राहील. तसेच सफाई कामासाठी लावण्यात आलेल्या कामगारांचे ईपीएफ रक्कम
नियमाप्रमाणे भरणा करणे बंधनकारक राहील. त्यासाठी कामगारांची यादी व त्यांना दिलेली वेतन रक्कम यांचे अभिलेखे ठेवण्याची
जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

९) बालकामगार कायद्यानुसार कंत्राटदारास सदर हाऊसकिपींगच्या कामाकरिता बालकामगार लावता येणार नाहीत.
१०) Workmen Compensation Act नुसार सर्व प्रकारच्या अपघातास व न्यायालयीन कार्यवाहीस आणि यापासुन होणा-या
दायित्वाची जबाबदारी कंत्राटदारावरच राहील.

११) साफसफाई कामाच्या मक्त्याचे प्रतिमहा देयक कंत्राटदारास स्वत: दाखल करावे लागेल, आर्थिक परिस्थीतीमुळे किंवा काही
कारणास्तव देयकाची रक्कम देण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मागण्याचा अधिकार कंत्राटदारास राहणार
नाही. तसेच कंत्राटदारास कामावरील कामगारांना स्वत: च्या स्त्रोतामधुन पगार दरमहा वेळेवर देणे बंधनकारक राहील. तसेच
महानगरपालिका निधी उपलब्धतेनुसार देयक अदाई करण्यात येईल.

१२) कोणत्याही परिस्थितीत मोठे नैसर्गिक कारण सोडता हाऊसकिपींगचे काम बंद ठेवता येणार नाही.
१३) दररोज साफसफाईचे कामाची पाहणी करण्यात येईल. साफसफाईचे काम समाधानकारक नसल्यास अटीतील अ दंडसुची
प्रमाणे दंड आकारण्यात येईल व तो दंड त्याच महिन्याच्या देयकातुन कपात करण्यात येईल.

१४) महानगरपालिका अधिकारी व पदाधिकारी व जनतेची साफसफाईबाबत तक्रार येणार नाही या पद्धतीने कार्यवाही करण्याबाबत
दक्षता घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१५) कंत्राटदाराने दररोज १० सफाई कामगार ओळखपत्रासह गणवेशामध्ये कार्यरत ठेवणे , संस्थेने लावण्यात येणा-या कामगारांना
त्यांच्या वयाची पात्रता पाहुन कामावर घेण्याचे/कामावरुन कमी करण्याचे सर्व अधिकार कंत्राटदारास राहतील.

१६) सफाई कामगारांच्या शर्टवर ठळक दिसेल असे MAY I HELP YOU चे सुचना BADGE लावणे तसेच स्वच्छतेसाठी लागणारे
साहित्य जसे रसायणे, परफ्युम, डिटर्जन इ. विकत घेऊन वापरणे व मशीनरी ठेवणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१७) सदरील साफसफाई दिवसातुन दोन वेळेस(सकाळी ०९.०० च्या आत व दुपारी ०२.०० नंतर)सफाई करुन घेतल्यानंतर
कॉरीडॉर/पाय-या व इमारतीमधील दर्शनी भाग नियमीत स्वच्छ ठेवण्यासाठी सफाई कामगार कायम नियुक्त करणे बंधनकारक आहे.

१८) कंत्राटदारास दररोज १०० **टक्के साफसफाई** करणे, झाडलेला कचरा, पालापाचोळा व उरलेले टाकाऊ बांधकाम साहित्य
उचलणे **बंधनकारक राहील. साफसफाईचे काम** अत्यावश्यक सेवेत येत असल्यामुळे वर्षाचे ३६५/३६६ दिवस काम चालु ठेवावे
लागेल. कामगारांना साप्ताहिक सुट्टी देण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. सुट्टी देताना पर्यायी व्यवस्था करणे
बंधनकारक आहे. कचरा उचलण्याकरिता आवश्यक त्या उपाय योजना कंत्राटदारास स्वखर्चाने कराव्या लागतील.

१९) सदर कामाकरिता लावण्यात येणा-या कामगारांच्या आरोग्याची व सुरक्षेची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. सफाई कामगार
काम करीत असताना दुर्घटना होऊन जिवीत किंवा वित्तीय हानी झाल्यास त्याबाबत प्रतीपुर्ती देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची
राहील. महानगरपालिका त्यासाठी कोणत्याही प्रकारची जबाबदारी घेणार नाही.

कंत्राटदारांनी कामावर लावण्यात आलेल्या कामगारांचे किंवा त्यांच्या वारसांना देय रक्कम दिली नाही तर सदर रक्कम कंत्राटदाराच्या मक्ता देयकातुन कपात करण्यात येईल. महानगरपालिकेच्या कार्यरत कोणत्याही अधिकारी तथा पदाधिका-यांची जबाबदारी राहणार नाही.

२०) महानगरपालिकेतर्फे आवश्यकतेनुसार वेळोवेळी देण्यात येणा-या सुचना व आदेशांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

२१) मा.आयुक्त, मा.अतिरिक्त आयुक्त, मा.उपआयुक्त, मुख्य वैद्यकिय अधिकारी, वैद्यकिय अधिकारी हैदरबाग दवाखाना, वैद्यकिय अधिकारी शिवाजीनगर दवाखाना यांचे निरीक्षण पथक असेल त्या निरीक्षण पथकास दैनंदीन निरिक्षणाच्या वेळेस वरील अटीचे उल्लंघन झाल्याचे दिसुन आल्यास परिशिष्ट अ नुसार दंडाच्या सूची प्रमाणे योग्य दंडात्मक कार्यवाही करुन दंडाची रक्कम देयकातुन वसुल करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.

२३) कामगारांकडुन सफाई काम होत नसताना किंवा त्या दिवशी निरिक्षणाच्या वेळेस सफाई कामगार आढळुन आला नाही तर त्या दिवशीचे त्या कामगाराचे वेतन अट क्र.२६ प्रमाणे दंड दोन्हीची रक्कम देयकातुन वसुल करण्याचे अधिकार राहतील. त्या विरुद्ध कंत्राटदाराचा आक्षेप राहणार नाही.

२४) शासनाकडुन कोणत्याही प्रकारचे स्टँम्प ड्युटीचे थकीत रक्कम किंवा इएसआर क्लेम किंवा न्यायनिवाडा नुसार देकार रक्कम किंवा इतर प्रकारचे कर भरणा करण्यासंबंधीचे आदेश प्राप्त झाल्यास तशी रक्कम भरुन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील अन्यथा सदरची रक्कम सुरक्षा ठेव/अनामत रक्कमेमधुन कपात करण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.

परिशिष्ट अ

दंडाची सूची

| अ.क्र. | खालील बाबीचे उल्लंघन झाल्यास | दंडाची रक्कम | |
|---|---|---|---|
| | | किमान | कमाल |
| | | रु.२००/- | रु.५००/- |
| १ | साफसफाई नियमांचे प्रति उल्लंघनास प्रति दिवस | रु.२००/- | रु.४००/- |
| २ | सफाई कर्मचारी गैरहजर असल्यास प्रति कर्मचारी प्रतिदिवस | रु.१००/- | रु.३००/- |
| ३ | सफाई केलेल्या ठिकाणी जंतुनाशक औषधी, ब्लिचिंग पावडरचा वापर न केल्यास प्रतिदिवस प्रतिस्थळ | रु.३००/- | रु.५००/- |
| ४ | कामगार कायद्याचे उल्लंघन केल्यास प्रतिदिवस | रु.१०/- | रु.२५/- |
| ५ | साफसफाई व्यवस्थापनासाठी लावलेल्या कामगारांनी गणवेश न घातल्यास व कर्मचारी यांना ओळखपत्र दर्शनी भागावर न लावल्यास प्रतिदिवस | | |
| | याशिवाय इतर अटी शर्ती | | |

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

अतिरिक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रस्ताव व ई-लिलाव प्रक्रिया

**महानगरपालिका मालकीचे हैदरबाग दवाखाना व शिवाजीनगर दवाखाना येथे साफसफाई कामाकरिता एकुण १० सफाई कामगार पुरविणेच्या कामाचा मक्ता देणेसाठी कंत्राटदार यांनी सादर करावयाचे कागदपत्र खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | तांत्रिक लिफाफ्यात सादर करावयाची कागदपत्र/प्रमाणपत्र विवरण |
|---|---|
| १ | निविदा शुल्क भरणा केल्याची पावती. |
| २ | ईएमडी रक्कम भरणा केल्याची पावती. |
| ३ | Shop Act.अंतर्गत संस्था/कंपनी नोंदणी प्रमाणपत्र. |
| ४ | कामगार सहा.आयुक्त यांचे (लेबर लॉ) लायसन्स किंवा नोंदणी प्रमाणपत्र. |
| ५ | भविष्य निर्वाह निधी (EPF) नोंदणी प्रमाणपत्र. |
| ६ | ESIC नोंदणी प्रमाणपत्र. |
| ७ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र. |
| ८ | वस्तु व सेवाकर (GST) नोंदणी प्रमाणपत्र. |
| ९ | मागील ०३ वर्षातील आयकर भरल्याची विवरणत्र मागील ०३ वर्षातील ) सन.२०२०-२१,२०२१-२२,२०२२-२३) आयकर भरल्याची विवरणत्र ३ Yrs.ITR & service Tax/GST Return. |
| १० | मागील ०३ वर्षाचे (सन.२०२०-२१,२०२१-२२,२०२२-२३) प्रतीवर्ष रु.५० लक्ष उलाढालीचे सी.ए. (C.A.) कडुन प्रमाणित केलेले ताळेबंद अहवाल. |
| ११ | मागील किमान ०५ शासकिय/निमशासकिय कार्यालयांना सफाई कामगार पुरवठा केल्याचे अनुभव प्रमाणपत्र. |
| १२ | उपलब्ध सफाई कामगार यांची साक्षांकित यादी. |
| १३ | निविदाधारकांनी त्यांच्या संस्थेचे नाव कोणत्याही शासकिय/निमशासकिय कार्यालयाच्या काळ्या यादीत नसल्याचे तसेच त्यांच्या संस्थेविरुद्ध कोणत्याही प्रकारची फौजदारी, दंडात्मक कारवाई करण्यात आली नसल्याचे व कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसल्याचे नोटरीकृत शपथपत्र रुपये १००/- च्या बॉन्डपेपरवर सादर करावे. |
| १४ | निविदाधारकांनी त्यांच्या संस्था/एजन्सीमार्फत नेमण्यात येणारे सफाई कामगार यांना कोणत्याही प्रकारचे व्यसन नसल्याबाबत रु.१००/- च्या बॉन्डपेपरवर नोटरीकृत शपथपत्र सादर करावे. |
| १५ | महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी-२०२२/प्र.क्र./इमा-२ दि.११.०५.२०२२ अन्वये निविदाधारकांनी निविदेसाठी कामाचे नाव टाकुन निविदेसोबत जोडण्यात आलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे मुद्रांकवरचे प्रतिज्ञापत्र १००/- रुपयाच्या मुळ स्टॅम्प पेपरवर प्रत्येक निविदेसाठी स्वतंत्र टाकून जोडणे बंधनकारक आहे. |
| १६ | महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (फ) नुसार महापालिका पदाधिकारी यांचेशी निविदा संदर्भात प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे लेटर हेडवर स्वयंघोषणापत्र सादर करणे बंधनकारक राहील. |

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

अतिरिक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे हैदरबाग दवाखाना व शिवाजीनगर दवाखाना येथे सफाई कामाकरिता लावण्यात येणा-या सफाई कामगार यांचे वेतन व</u>**

**Service Charges <u>विवरण तक्ता</u>**

| अ.क्र. | कामगार संख्या (१०) | | प्रतीमहा प्रतीकामगार वेतन रक्कम | (Government of india ministry of Finance Department यांचे पत्र दि.०६.०१.२०२३ अन्वये Service Charges नमुद करावेत.) |
|---|---|---|---|---|
| १ | पुरुष कामगार संख्या | स्त्री कामगार संख्या | १८१६०/- | |
| | ०५ | ०५ | | |

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

अतिरिक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड